**रयत शिक्षण संस्थेचे,**

**चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी**

**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, अंतर्गत**

**राज्यशास्त्र विभाग आयोजित,**

**मानवी हक्क कोर्स**

**वार्षिक अहवाल २०२२-२३**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, अंतर्गत राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ६ महिन्याचा मानवी हक्क प्रमाणपत्र कोर्स सुरु करण्यात आला होता. या कोर्समध्ये महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटना, नागरिकांचे मूलभूत अधिकार, जागतिक पातळीवरील मानवी हक्कांची ओळख व माहिती, स्वातंत्र्य, समानता, बंधुता, या तत्वांची समाजमानसात जगताना ती कशी अवलंबावी या सर्व घटकांची माहिती होण्यासाठी हा कोर्स सुरु करण्यात आला. या विभागद्व्यारे वर्षभरात पुढील उपक्रम राबवण्यात आले.

१) दि. ०४/१०/२०२२ - २ आक्टोबर महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. विजय माने (सातारा) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२) दि. १५/१०/२०२२ - १० आक्टोबर जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मा. डॉ. मनीषा भोजकार (हुपरी) यांचे व्याख्यान आयोजि करण्यात आले.

३) दि. २६/११/२०२२ - संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकेचे उदघाटन मा. प्र. प्राचार्य प्रा. डॉ. डि. आर. भोसले यांच्या हस्ते उदघाटन घेण्यात आले. तसेच संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

४) दि. ०३/१२/२०२२ - सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, कोल्हापूर अंतर्गत समतापर्व २०२२ द्व्यारे तृतीयपंथी कल्याण व हक्कांचे संरक्षण अंतर्गत तृतीयपंथी हक्क, अधिकारांबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजना करण्यात आला यावेळी मा. दिलशाद मुजावर (तृतीयपंथी कल्याण हक्कांचे संरक्षण अंतर्गत राज्यस्तरीय सदस्य) व मा. श्री. विशाल लोंढे (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, कोल्हापूर) यांचे व्याख्यान झाले.

५) दि. ०६/१२/२०२२ - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मा. प्रा. डॉ. सुनील चंदनशिवे यांचे व्याख्यान अलॉजीत करण्यात आले.

६) दि. १०/१२/२०२२ - जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकेचे अनावरण मा. श्री. शिवराज नाईक व मा. श्री. अजित पाटील (सदस्य , महाविद्यालय विकास समिती, हुपरी) यांच्या हस्ते करण्यात आले.

७) दि. २५/०१/२०२३ - राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृतीपर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, तसेच 'मतदार राजा जागा हो' या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रबोधनात्मक पथनाट्याच्या सादरीकरण रेंदाळ , हुपरी परिसरात केले.

८) दि. ०९/०३/२०२३ - ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र, हुपरी यांच्या वतीने आरोग्य अधिकारी मा. डॉ. प्राजक्ता जाधव यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली व विद्यार्थ्यांना कॅल्शिअमच्या गोळ्या मोफत वाटल्या.

अशा प्रकारे वर्षभरात मानवी हक्क विभागाच्यावतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. यास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

HEAD
Dept. Of. Political Science
C. S. S. College, Hupari